नि.दि.दा.क्र.४२/२००९
रंजित / सुरेश
वादीचा सा.क्र.०२
**नि.क्र. ११८**

**वादीतर्फे सरतपास विधीज्ञ श्री. आर.डी.किंदर्ले यांचे मार्फत शपथेवर सुरुः–**

०१. मी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. सदर मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**प्रतिवादींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.पी.के.थोटे यांचे मार्फत–**

०२. मला शेतजमीन असुन त्याचा नंबर ११४ आहे. त्याचे क्षेत्रफळ मी सांगु शकत नाही. माझ्या मालकीची शेतजमीन गट क्र.११४ असल्याबाबत मी कागदपत्र दाखल केले नाही. त्या शेतीचे कोणकोण मालक आहेत याबाबत मी कोणताही अभिलेख आणलेला नाही. रंजीत याच्या नावाने शेती असल्याबाबत मी अभिलेख सोबत आणला नाही. रंजीत याच्या नावाने गट क्र.२४८ ही शेतजमीन आहे. त्याबाबत मी महसुल अभिलेख पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अभिलेख पाहिला नसल्यामुळे गट क्र.२४८ ला मालक म्हणुन कोणाचे नाव आहे हे मला माहित नाही. गट क्र.२४८ चा मालक रंजीत असल्याबाबत मी त्याने सांगितल्यावरुन सांगत आहे. मला कोणाच्या शेतातुन रस्ता आहे या बाबत मी निकाशा दाखल केला नाही अथवा मी तसा नकाशा पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यात काय वाद आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला रंजीत याने बयान देण्यासाठी चाल असे सांगितल्यावरुन मी बयान देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रातील माहिती तयार करुन ठेवलेली होती, त्यावर मी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वादी व प्रतिवादी यांच्या कब्जे वहिवाटीबाबत माहिती नाही. माझ्या शेतजमीनीच्या पूर्वेस भगवान खनदाडे याची शेतजमीन असुन त्याचा क्रमांक मला माहित नाही. माझ्या शेताच्या पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस कोणता गट क्रमांक आहे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही

की, मी रंजीत याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**सरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/-

(पी. के. मुटकुळे)

दि. २२.०१.२०२६.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कुही, जि.नागपूर.